प्रेस नोट दिनांक १०/०२/२०१८

## (चाईल्ड प्रोटेक्शन युनिट, गुन्हे शाखा, ठाणे शहर)

महाराष्ट्र राज्यात प्रथमच ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात गुन्हे शाखे अंतर्गत १७ जुलै २०१४ मध्ये चाईल्ड प्रोटेक्शन युनीट चालु करण्यात आले. ठाणे आयुक्तालयात हरविलेल्या/पळविलेल्या मुलांचा शोध घेणे, कामगार आयुक्त यांचे आदेशाने धाडसत्रात भाग घेवुन बाल कामगारांची मूक्तता करणे, भिक्षेकरी मुलांच्या विषयाची कारवाई ही या युनिटची कर्तव्य निश्चित करण्यात आली आहेत. या कर्तव्याच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने हरविलेल्या/पळविलेल्या मुलांचा शोध घेणेसाठी **''ऑपरेशन मुस्कान''** अशा नावाच्या ५ मोहिमा आजपावेतो राबविण्यात आल्या. या पाचही मोहिमे अंतर्गत करण्यात आलेली कार्यवाही व या योजनांना मिळालेला अतिशय चांगला प्रतिसाद यामुळे अनेक दुर्लक्षीत अशा मुलांना त्यांचे घरापर्यंत पोहचविणे शक्य झाले.

ठाणे पोलीस आयुक्तालयात चाईल्ड प्रोटेक्शन युनिट नव्याने स्थापन झाल्याने हरविलेल्या/पळवुन नेलेल्या मुलांच्या शोधासाठी व त्यांना त्यांच्या घरापर्यंत सुखरूप पोहचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्यामुळे अनेक मुलांना त्यांच्या पालकांपर्यंत पोहचविण्यात ठाणे शहर पोलीस दलाला चांगले यश प्राप्त झाले. पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर अंतर्गत चाईल्ड प्रोटेक्शन युनिटचे पोलीस अधिककारी/कर्मचारी तसेच पोलीस ठाणे पातळीवरील विशेष बाल पोलीस पथक यांनी संयुक्तरित्या अहोरात्र अथक परिश्रम करुन युनिट स्थापन झाले पासुन ते आज पावेतो **सन २०१४ ते सन २०१६ एकुण १०३६ मुलांना तसेच सन २०१७ मध्ये २४८ मुले अशी एकुण १,२८४ मुलांना** शोधुन त्यांना सुखरूपपणे त्यांचा पालकांपर्यंत पोहचविण्यात आले आहेत. तसेच **सन २०१७ मध्ये ०५ भिक्षेकरी** यांचेवर कारवाई करून त्यांना शासकिय भिक्षेकरी स्विकार केंद्र, चेंबुर येथे पाठविण्यात आलेले आहे. शासनाच्या आदेशाने राबविलेल्या विशेष पाच **''ऑपरेशन मुस्कान'' या योजनामध्ये एकुण ६३७ मुलांना** त्यांच्या घरापर्यंत पोहचविण्याची मोलाची कामगिरी करण्यात आलेली आहे. तसेच ठाणे शहर, मुंबई येथील बालगृह/निरीक्षणगृह, शासकीय संस्था व इतर खाजगी संस्था, विशेषगृह येथील एनजीओ, सीडब्ल्युसी सदस्य यांच्या सहकार्याची देखील मोलाची भर पडली आहे.

सध्या चाईल्ड प्रोटेक्शन युनिट मध्ये २ पोलीस अधिकारी व ११ कर्मचारी कार्यरत आहेत. सदर युनिटने बालकामगार आयुक्त यांचे मदतीने अनेक छापे टाकुन लहान मुलांना बाल मजुरीपासुन मुक्त केले आहे. ठाणे शहर व जिल्हयातील अपहरण झालेल्या मुलांना वेगवेगळया राज्यामधुन शोधुन आणुन त्यांचे पालकांचे स्वाधीन केले आहे. तसेच अनेक राज्यामधुन भरकटुन ठाणे, मुंबईत आलेल्या अनेक मुलांना सीडब्ल्युसीच्या मदतीने त्यांचे पालकापर्यंत पोहचविलेले आहेत. या युनिटमध्ये कार्यरत असलेला सर्व स्टाफ हा प्रशिक्षीत असुन ते मुलांचे व त्यांचे आई वडिलांचे योग्य प्रकारे समुपदेशन करीत असतात. सीपीयुची कामगिरी पाहुन अनेक सामाजिक संस्था आमचेशी संपर्क करीत असुन त्या लहान मुलांसाठी काम करण्यासाठी तत्पर्ता दाखवित आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री. परम बीर सिंह सो., यांचे मार्गदर्शनाखाली सह. पोलीस आयुक्त श्री. पाण्डेय सो., अप्पर पोलीस आयुक्त श्री. रानडे सो., पोलीस उप.आयुक्त श्री. अभिषेक त्रिमुखे सो., सहा.पोलीस आयुक्त (प्रति) श्री. बाजीराव भोसले सो., व चाईल्ड प्रोटेक्शन युनिटचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदरची कामगिरी केलेली आहे.